# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## वैद्यकीय विभाग
## स्वारस्य व्यक्त करणे (EXPRESSION OF INTEREST)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत " नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र " व " हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना " तात्काळ कार्यान्वीत करणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी जागा भाडेतत्वार घेणेसाठी स्वारस्य व्यक्त करतो. इच्छुक जागा मालक अथवा संस्थांनी आपले प्रस्ताव दि.१३/०२/२०२४ पर्यंत सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत आपली मिळकत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खालील नमूद केलेल्या ज्या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येत आहे त्या क्षेत्रीय कार्यालयाच्या संबंधीत क्षेत्रीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावाने बंद पाकिटामध्ये सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये व विहित मुदतीत सादर करावेत.

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालय नांव | पत्ता | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | अ क्षेत्रीय कार्यालय | अ प्रभाग कार्यालय, भेळ चौक, निगडी, प्राधिकरण निगडी -४११ ०४४ | श्रीम.सुचिता पानसरे (मो.क्र.९०२८८८७६३१) (कार्यालय- ०२०-२७६४१६२७) |
| २ | ब क्षेत्रीय कार्यालय | ब प्रभाग कार्यालय, लिंक रोड, एल्प्रो कंपनी परिसर, चिंचवड -४११ ०३३ | श्री. अमित पुरुषोत्तम पंडित (मो.क्र. ९८९००१९२३२) (कार्यालय- ९९२२५०१४५५) |
| ३ | क क्षेत्रीय कार्यालय | क प्रभाग कार्यालय नेहरूनगर भोसरी - ४११ ०३९ | श्री. अण्णा बोदडे (मो.क्र. ९९२२५०१९४२) (कार्यालय- ०२०-२७१२७७७७) |
| ४ | ड क्षेत्रीय कार्यालय | ड क्षेत्रिय कार्यालय, औंध रावेत बीआरटी रोड, रहाटणी- ४११ ०१७ | डॉ.अंकुश जाधव (कार्यालय- ९९२२५०१४५९) |
| ५ | इ क्षेत्रीय कार्यालय | ग्रोथलैब इमारत, पांजरपोळ समोर, पुणे-नाशिक रोड, भोसरी ४११०३९ | श्री.राजेश आगळे (मो.क्र. ९५५२५११९७२) (कार्यालय- ८६०५८२२७७७) |
| ६ | फ क्षेत्रीय कार्यालय | लोकमान्य टिळक चौक, निगडी | श्री. सिताराम बहुरे (मो.क्र. ९९२३९८९७७४) (कार्यालय- ०२०-२७६५००३२४) |
| ७ | ग क्षेत्रीय कार्यालय | करसंकलन कार्यालय व शेजारील माध्यमिक विद्यालय नवीन इमारत,थेरगांव | श्रीम. शितल वाकडे (मो.क्र. ९४२२३२०६९७) (कार्यालय- ०२०-६७३३३३३३) |
| ८ | ह क्षेत्रीय कार्यालय | कासारवाडी महिला आय.टी.आय. कासारवाडी | श्री.उमेश ढाकणे (मो.क्र. ८८३०८२९०९१) (कार्यालय- ०२०-२७१४२५०४) |

❖ **आवश्यक कागदपत्रे, नियम आणि अटी :-**

१) जागा मालकासोबत ११ महिन्यांचा नोंदणीकृत भाडेकरार विहित करारनामा नमुन्यानुसार करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार मुदतवाढ देणेत येईल.

२) भाडे तत्वावर द्यावयाची मालमत्ता / मिळकत चतु:सीमा सहित देणे आवश्यक आहे.

३) भाडे तत्वावर द्यावयाची मालमत्ता / मिळकत ही मालकाच्या ताब्यात असणे आवश्यक आहे.

४) भाडे तत्वावर द्यावयाच्या मालमत्ता / मिळकतीचे सर्व कर, पाणी पट्टी, विद्युत देयके करारनामा करण्याच्या तारखेपर्यंत भरलेली असणे आवश्यक आहे. (पावत्या सादर करणे आवश्यक)

५) भाडेकरार केल्याच्या तारखेपासून करार संपुष्टात येण्याच्या तारखेपर्यंत येणारी सर्व विद्युत देयके, पाणी देयके वैद्यकीय विभाग पिं.चिं.म.न.पा. मार्फत अदा करण्यात येतील आणि जागेचा प्रॉपर्टी टॅक्स, जागेचा मेंटेनन्स व भाडेकरार करणेकामी होणारा खर्च जागा मालकाने करावयाचा आहे.

६) मालमत्तेच्या उपभोगाकरीता बाजारभावाप्रमाणे अथवा मनपा मार्फत निश्चित केलेल्या दराने दरमहा भाडे अदा करण्यात येईल.

७) करार कालावधीत विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा यामध्ये काही बिघाड झाल्यास होणारी दुरुस्ती जागा मालकाने स्वखर्चाने करून देणे आवश्यक आहे.

८) करार कालावधीत इमारतीचा सुयोग्य वापर करण्याची जबाबदारी वैद्यकीय विभाग, पि.चिं.म.न.पा यांची राहील.

९) वैद्यकीय विभाग, पिं.चिं.म.न.पा.कडून सुचविण्यात आल्याप्रमाणे इमारतीचा ताबा देण्यापूर्वी रंगरंगोटी, दुरुस्ती करून देणे आवश्यक आहे.

१०) इमारतीबाबत भविष्यात वादविवाद किंवा काही अडचण निर्माण झाल्यास भाडे करार आपोआप संपुष्टात येईल. कायदेशीर बाबी उद्भवल्यास जागा मालक जबाबदार राहतील.

११) सदर भाडे करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील. त्याबाबत जागा मालकास कोणताही हस्तक्षेप करता येणार नाही.

१२) स्वच्छतागृह व वॉश बेसिनची सोय जागा मालकाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

१३) इमारतीमध्ये आवश्यक फर्निचर व बाहयरुग्ण विभाग चालू करण्यासाठी पुरेशी बैठक व्यवस्था (टेबल, खुर्ची, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी) करण्यासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक आहे.

१४) भाडयाने द्यावयाच्या जागेचे बांधकामाचे आकारमान हे कमीत कमी ७५० ते १००० स्केअर फुट असणे आवश्यक आहे. तसेच कमीत-कमी ०३ ते ०४ रुम मिळकतीमध्ये असणे आवश्यक आहेत.

१५) मध्यवर्ती रस्त्या लगत असलेल्या जागांना प्राधान्य देण्यात येईल.

१६) एकाच ठिकाणासाठी अनेक पर्याय उपलब्ध असल्यास प्राधिकृत अधिका-यांमार्फत समक्ष जागा पहाणी करुन जागेबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

१७) करार कालावधी दरम्यान इमारतीसाठी होणारा देखभाल दुरुस्तीचा खर्च जागा मालकाने करावा.

१८) जागा मालकाने भाडे करार रद्द करण्यासाठी कमीत कमी ३० दिवस ते ६० दिवस आगोदर पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे. पूर्व सूचना न दिल्यास अनामत (डीपॉझीट) रक्कम वसूल करण्यात येईल.

१९) करारनामा करणा-या मालकाच्या अथवा संस्थेच्या नावे इमारतीचे भाडे दरमहा अदा करण्यात येईल.

२०) जागा मालकास एक महिन्याचे भाडे डीपॉझीट म्हणून देण्यात येईल.

२१) वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदर भाडे करार पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडून रद्द करण्यात येइल. तसेच प्रलंबित देयके देखील अदा करण्यात येणार नाहीत.

२२) संस्था कंपनी असल्यास AOA व पार्टनरशिप फर्म असल्यास पार्टनरशिप डीड, LLP असल्यास त्याबाबतची कागदपत्रे संस्था/सोसायटी असल्यास नोंदणी संबंधीत कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

२३) कार्यान्वीत करावयाच्या " नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र " व " हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना " चे संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

२४) उक्त अटी व शर्ती मान्य असणा-या जागा मालकांनी अथवा संस्थेने आपला सारस्य अभिव्यक्तीचा प्रस्ताव आपली मिळकत ज्या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येत आहे येथील क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय, पिं.चिं.म.न.पा. यांचे नावाने बंद पाकिटामध्ये विहित नमुन्यामध्ये विहित मुदतीत सर्व स्वसाक्षांकित कागदपत्रांसह सादर करावा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत खालील क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यान्वीत करावयाच्या " नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र " व " हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना " ची संख्या खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नांव | आवश्यक संख्या |
|---|---|---|
| १ | अ क्षेत्रीय कार्यालय | ०४ |
| २ | ब क्षेत्रीय कार्यालय | ०२ |
| ३ | क क्षेत्रीय कार्यालय | ०५ |
| ४ | ड क्षेत्रीय कार्यालय | ०५ |
| ५ | इ क्षेत्रीय कार्यालय | ०५ |
| ६ | फ क्षेत्रीय कार्यालय | ०४ |
| ७ | ग क्षेत्रीय कार्यालय | ०५ |
| ८ | ह क्षेत्रीय कार्यालय | ०५ |
| | **एकुण-** | ३५ |

तरी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेल्या इच्छुक खाजगी जागा मालकांनी अथवा संस्थांनी सदर स्वारस्य व्यक्त करणे (EXPRESSION OF INTEREST) प्रकाशित झाल्यापासून दि.१३ / ०२ /२०२४ पर्यंत आपली मिळकत ज्या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येत आहे येथील क्षेत्रीय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालय, पिं.चिं.म.न.पा. यांचे नावाने बंद पाकिटामध्ये विहित नमुन्यामध्ये विहित मुदतीत सर्व स्वसाक्षांकित कागदपत्रांसह सादर करावा.

(शेखर सिंह)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

जा.क्र.वैद्य/९ड/कावि/ ९४ /२०२४
दिनांक-२४ ०१ / २०२४

जाहिरात क्रमांक- ५१४/२०२४

# जागा मालकाने भरुन द्यावयाचे नमुना पत्र

| अ.क्र. | तपशील | तपशीलाशी निगडीत माहिती |
|---|---|---|
| १ | बांधकाम केलेल्या जागेच्या मालकाचे नांव | |
| २ | घर क्रमांक/गाव व पुर्ण पत्ता | |
| ३ | बांधकाम केलेल्या जागेचे अंदाजे क्षेत्रफळ | चौ.मी ( चौ. फुट) |
| ४ | जागा आवश्यकतेनुसार बांधकामाचे आकारमान (७५० ते १००० स्केअर फुट) उपलब्ध आहे किंवा जास्त आहे | |
| ५ | बांधकाम केलेली जागा वर्दळीच्या ठिकाणी आहे काय? | |
| ६ | जागा मालकाने मागणी केलेले प्रतिमहा भाडे र.रु. | |
| ७ | विद्युत मीटर आणि पाणी पुरवठा आहे काय? | |
| ८ | बांधकाम केलेली जागा चांगल्या स्थितीत वापरण्यायोग्य आहे काय? | |
| ९ | बांधकाम तारीख व वर्ष | |
| १० | बांधकाम जागेचा नकाशा व माहिती (नकाशा जोडणे) | |
| ११ | शेवटचे वीज देयक भरल्याची पावती | |
| १२ | शेवटचा मालमत्ता कर भरल्याची पावती | |
| १३ | बांधकामाचा प्रकार | |
| १४ | सदरचे बांधकाम अधिकृत अथवा अनधिकृत आहे काय ? | |
| १५ | बांधकाम केलेली जागा ज्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत आहे त्या क्षेत्रीय कार्यालयाचे नांव व पत्ता | |

टीप:- जोडण्यात येणारी सर्व कागदपत्रे छायांकित व स्वसाक्षांकित असावी. आवश्यकता भासल्यास मुळ कागदपत्रे पाहण्यासाठी सादर करावी लागतील.

बांधकाम जागा मालकाचे नांव:-

बांधकाम जागा मालकाची स्वाक्षरी:-

दिनांक:- / /२०२४